महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/रस्ता दुरूस्ती परवानगी/ 62 /२०२२ दि. 23/०९/२०२२

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण शहरात दि. २६/०९/२०२२ ते दि. ०५/१०/२०२२ या कालावधीत नवरात्रौत्सव व दसरा हे सण किल्ले दुर्गाडी येथे साजरे होणार आहेत. सदर कालावधीत जनसमुदाय रस्त्यावर येवून सण साजरा करीत असतात. याकरीता दुर्गामाता चौक व कल्याण शहरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित व्हावी तसेच नागरिकांची गैरसोय होवू नये याकरीता, **आम जनतेच्या सोईसाठी,**

**त्याअर्थी,** मी गणेश गावडे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/मीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद–** १) लाल चौकी ते दुर्गामाता चौक मार्गे भिवंडी कडे जाणाऱ्या जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना लाल चौकी येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने लाल चौकी येथून उजवीकडे वळण घेवून आधारवाडी चौक – गांधारी ब्रिज मार्गे पडघा बाजूने इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) भिवंडी कडून दुर्गामाता चौकातून लाल चौकी कडे जाणाऱ्या जड, अवजड, मल्टिएक्सल वाहनांना दुर्गाडी चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर वाहने दुर्गामाता चौकातून डाव्या बाजूस वळण घेवून वाडेघर चौक – आधारवाडी चौक मार्गे मुरबाड रोड हायवेने अथवा लाल चौकी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) पत्रीपूल कडून गोविंदवाडी बाहयवळण मार्गावरून दुर्गाडी चौक कडे तसेच दुर्गाडी चौक कडून गोविंदवाडी मार्गे पत्रीपुलाकडे येणाऱ्या लहान वाहनांना (कार, रिक्षा) सायंकाळी १६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** अ) सदर वाहने जुना आग्रा रोडने पत्रीपूल – वल्लीपीर –गुरूदेव हॉटेल – शिवाजी चौक – सहजानंद चौक – लाल चौकी मार्गे दुर्गाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
ब) दुर्गाडी चौक येथून लाल चौकी – सहजानंद चौक – शिवाजी चौक – गुरूदेव हॉटेल – वल्लीपीर येथून पत्रीपूल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना नवरात्रौत्सव व दसरा सणाचे कालावधीत म्हणजेच दि. २६/०९/२०२२ ते दि. ०५/१०/२०२२ रोजी दरम्यान सायंकाळी १६:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( गणेश गावडे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u>**

- मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
- मा. जिल्हाधिकारी, ठाणे
- मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,कल्याण.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
- नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
- ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** — पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

प्रत :— सर्व संबंधीत वाहतूकदार संघटना.

CS CamScanner